वैचारिक क्रांतीचा अग्रदूत
# देशोन्नती
अकोला सोमवार, दि. २२ मार्च २०२१ पृष्ठे ६+८=१४ मूल्य ₹:६

# शेतकऱ्यांसाठी बांबू टिशू कल्चर रोप लागवड योजना

देशोन्नती वृत्तसंकलन...

अकोला ■वन विभाग आणि सेवा धर्मशिक्षण व संस्था अकोला यांच्या वतीने जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याकरिता राष्ट्रीय बांबू मिशन अंतर्गत बांबूची रोपे व योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. बांबू शेती योजनेचा उद्देश जलद वाढ होणाऱ्या व उच्च प्रजातीच्या बांबू प्रजातीतील शेती खासगी जमिनीवर लागवड करून बांबू शेतीचा विकास करणे हा आहे. उत्पादन वाढीबरोबरच शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्न स्रोत निर्माण होऊन, स्थानिक बांबू कारागिराला व त्यावर आधारित उद्योगांना कच्चामाल उपलब्ध होईल. या योजनेमध्ये ५० टक्के रक्कम अनुदान शासन व महाराष्ट्र बांबू विकास मंडळातर्फे प्रदान करण्यात येईल. या योजनेत शेतकऱ्याला कोणतेही आंतरपीक घेता येईल. तसेच जास्तीत जास्त दोन हेक्टर क्षेत्र करिता अनुदान दिले जाईल तसेच शेताच्या बांधावर लागवड करण्यात येईल .. या योजनेमध्ये उर्वरित ५० टक्के रक्कम शेतकऱ्यांनी स्वतः खर्च करायचे आहे राष्ट्रीय बांबू मिशन द्वारा निर्मित केलेल्या योजना या पैकी कोणत्याही एका योजनेमध्ये शेतकऱ्यांना सहभागी होता येईल. शेतकऱ्याला सिंचन व कुंपणाची व्यवस्था करावी लागेल . या योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुक शेतकरी बांधवांनी संस्थेचा व्हाट्सॲप क्रमांकावर नोंदणी करावी .केंद्र शासनाची बांबू मिशन योजना सन २०२१ चे पावसाळ्या करिता लागु आहे.

**वन विभाग, सेवा संस्थेचा संयुक्त उपक्रम**

**अकोला, अकोट तहसीलअंतर्गत शेतकऱ्यांसाठी योजना यावर्षी फक्त अकोट व अकोला तहसील अंतर्गत क्लस्टर तयार करुन लागवड करण्यासाठी आहे. शेत बांधावर किंवा गट लागवड प्रती लाभार्थी किमान ०.५ हे. व कमाल २ हे. करीता असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.**

epa

आपलं हक्काचं दैनिक

मातृभूमि

बाजोरीया ग्रुप

वर्षे-९१ / अंक - २४८/ पृष्ठे ८+४ =१२

# शेतकरी बांधवांकरिता बांबू टिशू कल्चर रोपे लागवड योजना


**अकोला।** वन विभाग महाराष्ट्र शासन व सेवा धर्मशिक्षण व संस्था अकोला यांच्या वतीने जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याकरिता राष्ट्रीय बांबू मिशन अंतर्गत बांबूची रोपे व योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे . बांबू शेती योजनेचा उद्देश जलद वाढ होणाऱ्या व उच्च प्रजातीच्या बांबू प्रजातीतील शेती खाजगी जमिनीवर लागवड करून बांबू शेतीचा विकास करणे हा आहे. उत्पादन वाढीबरोबरच शेतकर्यांना अतिरिक्त उत्पन्न स्त्रोत निर्माण होऊन, स्थानिक बांबू कारागिराला व त्यावर आधारित उद्योगांना कच्चामाल उपलब्ध होईल. या योजनेमध्ये ५० टक्के रक्कम अनुदान शासन व महाराष्ट्र बांबू विकास मंडळातर्फे प्रदान करण्यात येईल. या योजनेत शेतकऱ्याला कोणतेही आंतरपीक घेता येईल.तसेच जास्तीत जास्त दोन हेक्टर क्षेत्र करिता अनुदान दिले जाईल तसेच शेताच्या बांधावर लागवड करण्यात येईल . या योजनेमध्ये उर्वरित ५० टक्के रक्कम शेतकऱ्यांनी स्वतः खर्च करायचे आहे. राष्ट्रीय बांबू मिशन द्वारा निर्मित केलेल्या योजना या पैकी कोणत्याही एका योजनेमध्ये शेतकऱ्यांना सहभागी होता येईल .

पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दै

# सिटी न्यूज सुपरफा

अकोला ■ वर्ष १० ■ अंक १२ ■ गुरूवार, दि. १५ जुलै २०२१ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६ Postal Regn. No. AKL DN/179/2016-201 RNI No.-MAHMAR/2012/49642

## महाएनजीओ फेडरेशनच्यावतीने, पं. शामा प्रसाद मुखर्जी यांचे जयंती निमित्त वृक्ष लागवड संपन्न



**प्रतिनिधी**/ १५ जुलै

**अकोलाः** प.शामा प्रसाद मुखर्जी यांनी जयंती व कै. रमेश रमण यांच्या श्रद्धांजली निमित्त अकोला शहराच्या मलकापूर परिसरातील ओम सोसायटी मध्ये पाण्याच्या टाकी जवळ वृक्ष लागवड कार्यक्रम आज संपन्न झाला आहे. महाएनजीओ फेडरेशन महाराष्ट्र पुणे चे संस्थापक अध्यक्ष शेखर भाऊ, मुंकुद शिंदे, विजय वरूडकर, गणेश बकाले यांच्या मार्गदर्शनाखाली १ ते २३ जुलै २०२१ पर्यंत महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हयात तसेच तालुक्यात वृक्ष लागवड व संवर्धन करण्यात येत आहे. या संस्था आपआपल्या तालुक्यात कार्यक्षेत्रात किमान ६६ वृक्ष यामध्ये कडुनिंब, करंज, वड, उबर, पिंपळ, चिंच, नांद्रुक, आपटा, अशोका, गुलमोहर इ. देशी वृक्ष लागवड केली जाणार आहेत. तसेच वृक्षांचे जनावरे यापासून संरक्षण व्हावे यासाठी संरक्षण जाळी देखील लावली जातआहे. यासाठी जमिनीच्या स्तराप्रमाणे

➤ पान २ वर

### महाएनजीओ फेडरेशनच्यावतीने...

खोलीप्रमाणे खड्डयाचे अकारम न ठरवून खड्डा खोदुन खड्डयात शेणखत, हिरवळीचे खत, किड प्रतिबंधक पावडर इ. मिसळून मातीच्या मिश्रणातून खड्डे तयार केले जाणार आहेत. गावाच्या परिसरात, सार्वजनिक ठिकाणी, शाळा, महाविद्यालय परिसरात शेत रस्ते या ठिकाणी वृक्ष लावली जातआहेत. या उपक्रमामध्ये सेवाधर्म शिक्षण व बहुउद्देशिय संस्था अकोला सहभागी झालीआहे. वर्षी नुवर्ष सुरू असलेली वृक्ष तोड त्यामुळे दुषित झालेले वातावरण त्यामुळे हवेतील ऑक्सीजनची पातळी कमी झालेली आहे त्याम मुळे अनेक नागरिकांना वेगवेगळ्या आजारांना सामोरे जावे लागत आहे. महाएनजीओ फेडरेशनचा हा उपक्रम पूर्णपणे यशस्वी राबविल्याने निश्चितच हवेतील ऑक्सीजनचे प्रमाण वाढणार आहे. यावेळी समाज सेवक रामदास जी खंडारे, प्रा. दिनकरराव धामनकर, गोपाळ मुळे, तडस साहेब, चोपडे साहेब, ताले साहेब, भोपळे साहेब, महल्ले साहेब, डॉ मिडदाजी, भटकर, दुबेजी, उषा दाळू, रेखा दाळू, कल्पना महल्ले, मावंदे साहेब, श्रीमती शर्मा, थोते साहेब, कुलकर्णी साहेब, कु. पांडे, जयसिंग ठाकूर, उमा धामणकर, कुमुद वाघमारे, संध्या हांडे, शुभम हांडे यांचे सह परिसरातील नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते. अशी माहिती सेवाधर्म संस्थेचे अध्यक्षप्रा धनंजय कोठाले, संचालक गजानन वाघमारे यांनी दिली.

रविवारीय
देशोन्नती
अकोला रविवार, दि.२० जून २०२१ पृष्ठे ८+६ =१४ मूल्य ₹:६



# जागतिक योग दिनानिमित्त उद्या योग यज्ञ

देशोन्नती वृत्तसंकलन...

**अकोला** ▪ जागतिक योग दिनानिमित्त महाएनजीओ फेडरेशन महाराष्ट्र राज्य व ,सेवाधर्म शिक्षण व बहुउद्देशीय संस्था, अकोला या स्वयंसेवी संस्थेच्यावतीने सोमवार ,२१ जून रोजी भव्य योग यज्ञाचे आयोजन स्थानिक रणपिसे नगरातील श्री बारा ज्योतिर्लिंग मंदिर संस्थानच्या हॉलमध्ये सोमवारी सकाळी ७.३० ते ९.३० या वेळेत करण्यात आले आहे .

## बारा ज्योतिर्लिंग संस्थानात आयोजन

महाएनजीओ फेडरेशन ही महाराष्ट्रातील २ हजार स्वयंसेवी संस्थांचे संघटन करणारी संस्था आहे. जागतिक योग दिनानिमित्त महाएनजीओ फेडरेशनच्या १०० सदस्य संस्था राज्यभर एकाचवेळेस योग शिबीर घेणार आहेत. सदर योग शिबीर श्री श्री रविशंकरजी यांच्या बंगलोर येथील तज्ञ योगा प्रशिक्षीका रूची सुद यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे येथील महाएनजीओ फेडरेशनच्या कार्यालयातून ऑनलाईन लिंकद्वारा घेण्यात येणार आहे. सदर शिबीर राज्यातील वेगवेगळ्या ठिकाणी प्रोजेक्टवर दाखवून २५ व्यक्तीच्या सहभागाने योगासने, ध्यान, प्राणायाम व देशभक्तीपर गितांचे श्रवण या उपक्रमांनी साजरे केले जाणार आहे. राज्यातील कोरोनाजन्य परिस्थितीचा विचार करून सर्व शासन नियमांचे पालन करून सदर शिबीरे आयोजित करण्यात येणार आहेत .कोरोना हा आजार मनुष्याच्या फुफ्फूसावर आघात करतो योगा व प्राणायामांनी फूफ्फसांची कार्यक्षमता वाढते तसेच रोगप्रतिकारक शक्ती वाढते. या शिबिराचा निश्चितच कोरोनापासून बचाव तथा कोरोना मुक्तीसाठी उपाय म्हणून उपयोग होऊ शकतो म्हणून या शिबिरात जास्तीत जास्त लोकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन महाएनजीओ फेडरेशनचे संस्थापक शेखर मुंदडा, मुख्य कार्यवाह विजय वरूडकर, उपक्रम प्रमुख गणेश बाकले, मुकुंद शिंदे, सेवाधर्म शिक्षण व बहुउद्धेशिय संस्थाचे अध्यक्ष प्रा. धनंजय कोठाले , सचिव तुषार हांडे, संचालक गजानन वाघमारे यांनी केले आहे. कार्यक्रमाची सांगता महाएनजीओचे शशांक ओंबासे यांच्या पसायदानाने होणार आहे.

रविवार

आपलं हक्काचं दैनिक

# मातृभूमि

अकोला, वाशिम, बुलडाणा, यवतमाळ, अमरावती येथून एकाचवेळी प्रकाशित

अकोला। रविवार

२०.०६.२०२१

किंमत : ₹ ४/- ■ वर्ष ९१ अंक ३३८ ■ पृष्ठे ८+४ =१२

epaper- www.ematrubhumi.com

eportal -www.ematrubhumi.in

## अकोला येथे योग यज्ञाचे आयोजन

**अकोला ।** येथे जागतिक योग दिनानिमित्त महाएनजीओ फेडरेशन महाराष्ट्र राज्य व ,सेवाधर्म शिक्षण व बहुउद्देशीय संस्था, अकोला या स्वयंसेवी संस्थेच्या वतीने २१ जून रोजी भव्य योग यज्ञाचे आयोजन रणपिसे नगरातील श्री बारा ज्योतिर्लिंग मंदिर संस्थान चे वरील हॉल या ठिकाणी सकाळी ७.३० ते ९.३० या वेळेत करण्यात आले आहे. महाएनजीओ फेडरेशन ही महाराष्ट्रातील २००० स्वयंसेवी संस्थांचे संघटन करणारी संस्था आहे जागतिक योग दिनानिमित्त महाएनजीओ फेडरेशनच्या १०० सदस्य संस्था राज्यभर एकाचवेळेस योग शिबीर घेणार आहेत. सदर योग शिबीर श्री श्री रविशंकरजी याच्या बॅंग्लोर येथील तज्ञ योगा प्रशिक्षीका रूची सुद यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे येथील महाएनजीओ फेडरेशनच्या कार्यालयातून ऑनलाईन लिंक द्वारा घेण्यात येणार आहे.

अकोला

अकोला
महासागर जिल्हा विशेष
सोमवार, दि. २१ जून, २०२१ पान ३

# आज जागतिक योग दिनानिमित्त यज्ञाचे आयोजन

अकोला, दि. २० : येथे जागतिक योग दिनानिमित्त महाएनजीओ फेडरेशन महाराष्ट्र राज्य व ,सेवाधर्म शिक्षण व बहुउद्देशीय संस्था, अकोला या स्वयंसेवी संस्थेच्या वतीने २१ जून रोजी भव्य योग यज्ञाचे आयोजन रणपिसे नगरातील श्री बारा ज्योतिर्लिंग मंदिर संस्थान चे वरील हॉल या ठिकाणी सकाळी ७.३० ते ९.३० या वेळेत करण्यात आले आहे .

महाएनजीओ फेडरेशन ही महाराष्ट्रातील २००० स्वयंसेवी संस्थांचे संघटन करणारी संस्था आहे जागतिक योग दिनानिमित्त महाएनजीओ फेडरेशनच्या १०० सदस्य संस्था राज्यभर एकाचवेळेस योग शिबीर घेणार आहेत सदर योग शिबीर श्री श्री रविशंकरजी याच्या बॅंग्लोर येथील तज्ञ योगा प्रशिक्षीका रूची सुद यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे येथील महाएनजीओ फेडरेशनच्या कार्यालयातून ऑनलाईन लिंक द्वारा घेण्यात येणार आहे.

हे शिबीर राज्यातील वेगवेगळ्या ठिकाणी प्रोजेक्टवर दाखवून २५ व्यक्तीच्या सहभागाने योगासने, ध्यान, प्राणायाम व देशभक्तीपर गितांचे श्रवण या उपक्रमांनी साजरे केले जाणार आहे. राज्यातील कोरोनाजन्य परिस्थितीचा विचार करून सर्व शासन नियमांचे पालन करून हि शिबीरे आयोजित करण्यात येणार आहेत कोरोना हा आजार मनुष्याच्या फुफ्फूसावर आधात करतो योगा व प्राणायामांनी फूफ्फसांची कार्यक्षमता वाढते तसेच रोगप्रतिकारक शक्ती वाढते या शिबिराचा निश्चितच कोरोनापासून बचाव तथा कोरोना मुक्तीसाठी उपाय म्हणून उपयोग होऊ शकतो म्हणून या शिबिरात जास्तीत जास्त लोकांनी सहभाग घ्यावा असे आवाहन महाएनजीओ फेडरेशनचे संस्थापक शेखर मुंदडा, मुख्य कार्यवाह विजय वरूडकर, उपक्रम प्रमुख गणेश बाकले, मुकुंद शिंदे ,सेवाधर्म शिक्षण व बहुउद्धेशिय संस्थाचे अध्यक्ष प्रा. धनंजय कोठाले , सचिव तुषार हांडे, संचालक गजाननराव वाघमारे यांनी केले आहे. कार्यक्रमाची सांगता महाएनजीओ चे शशांक ओंबासे यांच्या पसायदानाने होणार आहे.

महाराष्ट्रातील एकमेव स्वतंत्र दैनिक

अजिंक्य भारत

www.ajinkyabharat.com अकोला, मंगळवार, दि. २२ जून २०२१ www.ajinkyabharat.in

# जागतिक योगदिनानिमित्त महानगरात

## २ रणपिसे नगर, आयटीआयमुलींची प्रशिक्षण संस्था, शिवतेज प्रतिष्ठ

**अकोला, दि. २१ प्रतिनिधी**

**जागतिक योगदिनानिमित्त महानगरात विविध ठिकाणी प्रात्याक्षिकासह योगाचे धडे देण्यात आले.**

## रणपिसे नगर येथे योग दिन



आतंरराष्ट्रीय सातव्या योग दिनानिमित्त महा एन जी ओ फेडरेशन महाराष्ट्र, पुणे व सेवाधर्म शिक्षण व बहुउद्देशीय संस्था, अकोला च्या संयुक्त विद्यमाने दिनांक २१ जून २०२१ रोजी योग यज्ञ कार्यक्रमाचे आयोजन सकाळी ८ ते ९-३० दरम्यान रणपिसे नगरातील येथील श्री बारा ज्योतिर्लिंग मंदिर संस्थानच्या वरचे हॉल मध्ये करण्यात आला. आजीवन स्वास्थ सुदृढ ठेवण्यासाठी योग, आसन, प्राणायाम यांचा अंगीकार आपले ऋषी मुनी करून कित्येक वर्ष आनंदी जिवन जगत होते. परंतु पाच्यात्य संस्कृती चे अंधानुकरण, अनैसर्गिक जीवनशैली, विषयुक्त आहार आदी कारणामुळे मनुष्य अनेक रोगांनी त्रस्त झाला आहे. कोरोना सारख्या संसर्ग जन्य बिमारी वर शरीराची रोगप्रतिकारक क्षमता वाढविणे अतिआवश्यक झाले असून. योग आसन व प्राणायाम यामुळे हे व विना खर्च सहज शक्य होते. योग यज्ञ कार्यक्रमात दिप प्रज्वलन व राष्ट्र पुरुषांच्या प्रतिमेचे पूजन सौ. वनिता ताई राऊत व योग प्रशिक्षिका सौ मीरा घुगे यांनी केले. सर्वप्रथम प्रोजेक्टर वर श्री. श्री. रवी शंकर जी यांच्या बंगलोर येथील योग प्रशिक्षिका रुची सूद, यांनी योग आसनाचे जीवनामध्ये महत्व विशद केले. आर्ट ऑफ लिविंग चे श्री. अंकित बत्रा यांनी देशभक्ती गीत गायन करून उपस्थित साधकांना मंत्र मुग्ध केले, शासकीय योग प्रोटोकॉल नुसार ऑनलाईन लिंक द्वारा महाराष्ट्रातील २०० ठिकाणच्या योग साधकांना श्याम जाजू मार्गदर्शन केले. योग यज्ञ कार्यक्रमात राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. कार्यक्रमाला योग शिक्षक ज्ञानेश्वर कपले, प्रशांत साबळे, देवेन्द्र शेकोकार, यांची उपस्थिती होती.

वैचारिक क्रांतीचा अग्रदूत
# देशोन्नती
अकोला बुधवार, दि.२३ जून २०२१ पृष्ठे ६+८=१४ मूल्य ₹:६

# योगा व्हालेंटियर सर्टिफिकेशन कोर्ससाठी ऑनलाइन प्रवेश

**केंद्र सरकारच्या आयुष मंत्रालयाचा उपक्रम**

देशोन्नती वृत्तसंकलन...

**अकोला ■** इंटरनॅशनल नॅचरोपॅथी ऑर्गनायझेशन व सूर्या फाउंडेशन नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने योगा व्हालेंटियर सर्टिफिकेशन प्रोग्राम या ३६ तासाच्या ऑनलाईन कोर्सला नुकताच प्रारंभ झाला असून यासाठी १२ वर्षांच्या पुढील कोणतीही व्यक्ती प्रवेशित होऊ शकते. सदर कोर्स आयुष मंत्रालय भारत सरकारच्या माध्यमातून राबवला जाणार आहे.

या अभ्यासाचे साहित्यदेखील उपलब्ध होणार आहे. सदर कोर्स पूर्ण करणाऱ्या व्यक्तीला भारतामध्ये कोठेही योग शिक्षक होण्याची संधी उपलब्ध होऊ शकते. सदर कोर्स ऑनलाईन पद्धतीने होणार असून प्रवेशित होण्यासाठी डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू. वायसीबी.इनोसूर्या.कॉम या संकेतस्थळाला भेट देऊन प्रवेशित होऊ शकतात. या कोर्सबद्दल अधिक माहितीसाठी नंदुरबार जिल्ह्याचे आंतरराष्ट्रीय नॅचरोपॅथी ऑर्गनाझेशनचे उपाध्यक्ष प्रा.डॉ. नितीनकुमार माळी तसेच अकोला जिल्ह्यासाठी तुषार हांडे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन इंटरनॅशनल नॅचरोपॅथी ऑर्गनाझेशनचे उत्तर महाराष्ट्राचे अध्यक्ष पपू शिवानंद महाराज यांनी केले आहे.

आपलं हक्काचं दैनिक


मातृभूमि

अकोला, वाशिम, बुलडाणा, यवतमाळ, अमरावती येथून एकाचवेळी प्रकाशित

अकोला । मंगळवार

२२.०६.२०२१

श्री बारा ज्योतिर्लिंग मंदिर



## श्री बारा ज्योतिर्लिंग मंदिरात योग दिन

अकोला। आतंरराष्ट्रीय योग दिनानिमित्त महा एन जी ओ फेडरेशन महाराष्ट्र, पुणे व सेवाधर्म शिक्षण व बहुउद्देशीय संस्था, अकोला च्या संयुक्त विद्यमाने योग यज्ञ कार्यक्रमाचे आयोजन सकाळी ८ ते ९-३० दरम्यान रणपिसे नगरातील येथील श्री बारा ज्योतिर्लिंग मंदिर संस्थानच्या वरचे हॉल मध्ये करण्यात आले होते. योग यज्ञ कार्यक्रमात दिप प्रज्वलन व राष्ट्र पुरुषांच्या प्रतिमेचे पूजन वनिता राऊत व योग प्रशिक्षिका मीरा घुगे यांनी केले. आर्ट ऑफ लिविंग चे अंकित बत्रा यांनी देशभक्ती गीत गायन केले. योग यज्ञ कार्यक्रमात राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. कार्यक्रमाला योग शिक्षक ज्ञानेश्वर कपले, प्रशांत साबळे, देवेन्द्र शेकोकार यांची उपस्थिती होती.